Series ΣHEFG

SET ~ 4

प्रश्न-पत्र कोड
Q.P. Code **9**

रोल नं.
Roll No.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर प्रश्न-पत्रिकेचा कोड अवश्य लिहावा.
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **7** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला प्रश्न-पत्रिकेत कोड उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **15** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

- Please check that this question paper contains **7** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **15** questions.
- **Please write down the serial number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the candidates will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी
# MARATHI

*वेळ : **3** तास* | *गुण : **80***

*निर्धारित समय : **3** घंटे* | *अधिकतम अंक : **80***

*Time allowed : **3** hours* | *Maximum Marks : **80***

## विभाग – अ

15

1. पुढील गद्य उतारा वाचून त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आजकालचे युवक अनेकदा अशी तक्रार करताना आढळतात की, 'काय करायचे ?' आज आमच्यापुढे योग्य आदर्शच नाहीत. या कुरकुर करणाऱ्या लोकांचे मला हसूच येते. डोळे असूनही हे आंधळयाप्रमाणे वागत आहेत. त्यांनी आपले ज्ञानचक्षू बंद करुन घेतले आहेत नाहीतर आपल्या भोवताली होऊन गेलेल्या अनेक कृतार्थ जीवनाचा त्यांना विसर पडला नसता.

गेल्या शतकातील थोर विभूतींनी अनेक मोठी कामे केली, जोतिबा फुले आपल्या समाजसेवेच्या मार्गावर एकटेच जात होते. त्यांना साथ होती आपली पत्नी, एकट्या सावित्रीबाईची आणि विरोध होता साऱ्या समाजाचा. महर्षी कर्वे यांनी विधवाविवाहाचा स्वतःच्या उदाहरणाने पुरस्कार केला. स्त्रीशिक्षणासाठी हिंगण्याचा ओसाड मार्ग ते एकटेच चालत राहिले. ही उदाहरणे आजच्या युवकांना आदर्श ठरू शकत नाहीत का ?

ओसाड अशा कुण्डलभूमीवर लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी किर्लोस्करवाडीचा चमत्कार उभा केला. शून्यातून कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष उभा केला. नापीक, बरड जमिनीवर बाबा आमटे यांनी आनंदवन फुलविले आणि गात्र हरविलेल्या अपंगांच्या जीवनात नवा आत्मविश्वास फुलविला. स्वतःची प्रथम वर्गाची सर्टिफिकेटस् जाळणाऱ्या विनोबांनी उतारवयातही अनेक अपरिचित भाषांचा अभ्यास केला. शिष्यवृत्ती मिळवून स्वतःच्या उच्च शिक्षणासाठी गेलेले सेनापती बापट हे बॉम्ब तयार करण्याची विद्या शिकून आले. आपले शिक्षण अर्धवट राहिले याची खंत तात्यांना कधी वाटली नाही. असे एक ना अनेक आदर्श आजच्या विद्यार्थ्यांसमोर असतांनाही 'आदर्श नाही, आदर्श नाही' अशी कुरकुर विद्यार्थ्यांनी का करावी ? युवकांनो, तुमच्या भोवताली अनेक कृतार्थ जीवनाचे आदर्श आहेत, त्यांतून योग्य प्रेरणा मिळवा आणि असे जीवन जगा की, तुमचे जीवन इतरांना आदर्श ठरावे.

(क) खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

I. आजच्या युवकांची स्थिती म्हणजे ... 1

(अ) त्यांच्यापुढे योग्य आदर्श नाहीत.

(आ) डोळे असून आंधळयाप्रमाणे वागतात.

(इ) अनेक आदर्शजीवनांचा त्यांना विसर पडला नाही.

(ई) आदर्शवान

II. जोतिबा फुले यांना समाजसेवेमध्ये कोणी साथ दिली ? 1

(अ) साऱ्या समाजसेवी बांधवांनी (आ) त्यांच्या पत्नीने

(इ) ते एकटेच होते (ई) कोणीही नाही

III. गेल्या शतकात स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार प्रामुख्याने कोणी केला ? 1

(अ) विनोबा भावे (आ) बाबा आमटे (इ) महर्षी कर्वे (ई) रानडे

(ख) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

I. आजचे युवक कोणती तक्रार करतात ? लेखकाने त्याबाबत काय म्हटले आहे ? **2**

II. बाबा आमटे यांच्या कार्याचे वेगळेपण कोणते आहे ? **2**

III. गेल्या शतकात होऊन गेलेल्या थोर विभूतींच्या कार्याची थोडक्यात माहिती द्या. **3**

2. पुढील कविता वाचून त्याआधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

भव्य हिमालय तुमचा आमुचा केवळ माझा सह्यकडा.
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजिन रायगडा
तुमच्या आमुच्या गंगा यमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हाला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्तबुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला
धिक् तुमचे स्वर्गही साती, इथली चुंबिन भी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यांतुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा

(क) खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

I. कवीला कोणता पर्वत सर्वात प्रिय वाटतो ? **1**

(अ) हिमालय (आ) गौरीशंकर (इ) सह्यकडा (ई) सातपूडा

II. कवी मनोमन कशाची पूजा करतात ? **1**

(अ) गंगा यमुना (आ) कृष्णा (इ) रायगड़ (ई) गोदावरी

(ख) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

I. कवीला साती स्वर्गापेक्षा अधिक प्रिय कोणती गोष्ट आहे ? **1**

II. मराठी मातीचा पराक्रम कोणकोणत्या शब्दांतून व्यक्त होतो ? **1**

III. वरील कवितेमध्ये कृष्णेच्या पाण्याचे कोणते वैशिष्ट्य व्यक्त होते ? **1**

## विभाग – ब **15**

3. पुढीलपैकी एका विषयावर सुमारे **300/325** शब्दांचा निबंध लिहा. **10**

(दिलेल्या मुद्द्यांचा आधार घेउन आपले मत/विचार/कल्पना मांडू शकता)

I. साक्षर जनता – भूषण भारता

अज्ञान, निरक्षरतेचे तोटे – विकास, प्रगती नाही – साक्षरतेसाठी वेगवेगळया पातळीवर प्रयत्न – विविध उपक्रम – फायदे

II. महाविद्यालयाचा निरोप घेताना –

महाविद्यालयातील दिवस – शिक्षकांनी केलेले संस्कार – मित्रमैत्रिणींच्या आठवणी – व्यक्तिमत्त्व घडणीमध्ये सर्वांचे योगदान – कृतज्ञता – भावपूर्ण निरोप.

III. प्रदूषणाची समस्या

प्रदूषणाचे प्रकार – प्रदूषणाचा परिणाम – निर्माण होणाऱ्या समस्या – प्रदूषण कमी करण्याचे उपाय

IV. भग्न देवालयाचे आत्मवृत्त

गावाबाहेरील भग्न मंदिर – बोलू लागते – पूर्वीची संपन्न स्थिती – आजची स्थिती – दुःख – जीर्णोद्धार करण्याची विनंती.

4. खालील प्रश्नांची उत्तरे **70/75** शब्दांत लिहा. **5**

(क) अहवाल लेखनाची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

**किंवा**

(ख) वृत्तलेखकाला उत्तम संवाद कौशल्याची गरज का असते ?

## विभाग – क **25**

5. सूचनेनुसार उत्तरे लिहा.

पुढील शब्दांपैकी योग्य समानार्थी शब्द ओळखा. (कोणतेही **तीन**) **3 × 1 = 3**

I. रुखरुख

(अ) थांबून थांबून (आ) हळूहळू (इ) टोचणी (ई) मनोरंजन

II. वासरमणि

(अ) लहान वासरू (आ) सूर्य (इ) मुख्यमणी (ई) मोल्याची माळ

III. कवन

(अ) कोण (आ) छान (इ) काव्य (ई) गद्य

IV. रत्नाकर

(अ) रत्नांचा साठा (आ) समुद्र (इ) रत्नजडित (ई) सोनार

6. दिलेल्या समासांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) **2 × 2 = 4**

I. आईवडील

(अ) तत्पुरुष (आ) द्वंद्व (इ) अव्ययीभाव (ई) द्विगू

II. सूर्योदय

(अ) द्वंद्व (आ) अव्ययीभाव (इ) तत्पुरुष (ई) द्विगू

III. क्षणोक्षणी

(अ) तत्पुरुष (आ) द्वंद्व (इ) अव्ययीभाव (ई) द्विगू

IV. खरे खोटे

(अ) अव्ययीभाव (आ) तत्पुरुष (इ) द्वंद्व (ई) द्विगू

7. खाली दिलेल्या प्रयोगांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 2 = 6**

I. सुषमाने विनयला बोलावले.

(अ) कर्मणी (आ) कर्तरी (इ) भावे (ई) भावकर्तरी

II. सारिकाने कविता लिहिली.

(अ) कर्तरी (आ) भावे (इ) कर्मणी (ई) भावकर्मणी

III. संजय घराचे दार उघडतो

(अ) भावे (आ) कर्मणी (इ) कर्तरी (ई) भावकर्मणी

IV. शिक्षक मुलांना बक्षिसे देतात.

(अ) कर्तरी (आ) कर्मणी (इ) भावे (ई) भावकर्तरी

8. खाली दिलेल्या सूचनांप्रमाणे लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 2 = 6**

I. तू आमच्याबरोबर येतोस का ? (वाक्याचा प्रकार ओळखा)

(अ) विधानार्थी (आ) आज्ञार्थी (इ) प्रश्नार्थक (ई) मिश्र

II. श्वेता उद्या गावी जा. (विध्यर्थी करा)

III. शोळेमध्ये शिस्त पाळावी. (वाक्याचा प्रकार ओळखा)

(अ) प्रश्नार्थक (आ) विध्यर्थी (इ) आज्ञार्थी (ई) संयुक्त

IV. मुली रांगोळी छान काढतात. (प्रश्नार्थक करा)

V. तरुणांनो, यशाचा शिखर गाठा. (वाक्याचा प्रकार ओळखा)

(अ) विधानार्थी (आ) आज्ञार्थी (इ) प्रश्नार्थक (ई) संयुक्त

9. दिलेल्या सूचनेप्रमाणे योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही **तीन**) **3 × 2 = 6**

I. 'नक्षा उतरणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

II. 'सामसूम असणे' या वाक्प्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा.

(अ) स्वच्छता असणे (आ) धामधूम असणे (इ) शांतता असणे (ई) गारेगार असणे

III. 'अवहेलना करणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

IV. 'पगडा असणे' या वाक्प्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा.

(अ) प्रेम असणे (आ) प्रभाव असणे (इ) गर्व असणे (ई) टोपी घालणे

V. 'खल करणे' या वाक्प्रचाराच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा.

(अ) दुष्टपणा करणे (आ) धाक दाखवणे

(इ) निरर्थक चर्चा करणे (ई) मदत करणे

## विभाग – ड **25**

10. खालील प्रश्नांची योग्य पर्याच निवडून उत्तरे लिहा. **3 × 1 = 3**

I. आनंदाच्या झऱ्याचा उगम कोठे असतो ?

(अ) पैश्यामध्ये (आ) चैन करण्यामध्ये

(इ) आपल्या अंतरंगामध्ये (ई) बाह्य जगतात

II. उत्तररात्री लिहिण्यासाठी बसल्यावर कोणाची आठवण येते ?

(अ) फुलांची (आ) देवाची (इ) नातीची (ई) मुलांची

III. अनूने कोणता व्यवसाय करावा, असे लेखकाला वाटत होते ?

(अ) वकील (आ) डॉक्टर (इ) नर्स (ई) इंजीनियर

11. खालील प्रश्नांची उत्तरे **30** ते **40** शब्दांत लिहा. (कोणतेही **दोन**) **2 × 2 = 4**

I. लेखकाला उत्तररात्रीची वेळ का आवडते ?

II. लेखकाच्या दातदुखीवर शेजाऱ्यांच्या काय प्रतिक्रिया असतात ?

III. अमेरिकेमध्ये वेगाचा आश्रय का घेतला जातो ?

IV. अनुच्या दृष्टीने एक रुपयाची नोट महत्त्वाची का होती ?

12. खालील प्रश्नांची **80/90** शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) **8**

I. टॅक्सी ड्रायव्हरने अनूला कोणता सल्ला दिला व का ?

II. वाहनाचा वेग अनिवार वाढला तर वाहनधारकावर काय परिणाम होतो ?

III. आपल्या जीवनातील छंदांचे महत्त्व लेखकाने कसे पटवून दिले आहे ?

IV. लेखकाने पाखरांचे पहाटेशी असलेले नाते कसे वर्णन केले आहे ?

13. खाली दिलेल्योपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

I. कवयित्रीने सोन्याची फुले कशास म्हटले आहे ? **1**

(अ) सोनचाफा (आ) पिवळा गुलाब (इ) झेंडू (ई) पांढरा गुलाब

II. 'रंग माझा वेगळा' ही कविता कोणत्या प्रकारची आहे ? **1**

(अ) भक्तिगीत (आ) गझल (इ) मुक्त छंद (ई) ओवी गीत

14. खालील प्रश्नांची **30** ते **40** शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही **दोन**) **4**

I. आषाढ घनाच्या पाऊलखुणा कवीला कोठे कोठे दिसतात ?

II. कामक्रोध विंचू चावल्याचा माणसावर काय परिणाम होतो ?

III. बाई घरादाराला तोरण बांधते'या ओळीतून कवयित्रीला काय सुचवावयाचे आहे ?

IV. आरशातील स्त्री कोणाशी व का बोलते आहे ?

15. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा. (कोणताही **एक**) **4**

'विंचू चावला' या भारूडातून संत एकनाथ लोकांना कोणता उपदेश करतात ?

**अथवा**

थांब रे आषाढघना' या कवितेनील निसर्गचित्र तुमच्या शब्दांत लिहा.

---